Review Of Research
Vol. 3 | Issue. 12 | Sept. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.org

# उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षकांच्या आत्मविष्कार गुणांकाचा तौलनिक अभ्यास



**लता सुभाष मोरे (सुरवाडे)**

प्राचार्य, श्री.सुरुपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर जिल्हा नंदुरबार.

*सारांश :-*

**मॅस्लोच्या मते** :-"Become everything that one is capable of becoming."

प्रत्येक व्यक्तीत काही ना काही काम करण्याचे सामर्थ्य असते. ह्या पृथ्वीतलावर कोणतीही व्यक्ती टाकाऊ नाही. परंतु प्रत्येक विद्यार्थी आपल्या क्षमतांचा योग्य उपयोग करेलच असे नाही. असे म्हणतात की, 'घोड्याला पाण्यापर्यंत नेता येते पण पाणी पिण्याची सक्ती त्याला करता येत नाही'. उपरोक्त म्हणीचा प्रत्यय सर्वांनाच येतो विशेषत: शिक्षकांना तर येतोच येतो. तंत्रशुध्द रितीने केलेले कौशल्यपूर्ण अध्यापन देखील विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा किंवा शिकण्याची इच्छाच नसेल तर निष्प्रभ ठरते. विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करणे, ती टिकवून धरणे व त्यातूनच स्वत:च्या सुप्त क्षमतांचा विकास करणे यावर अध्यापनाचे यश बहुतांशी अवलंबून असते. विद्यार्थ्यांच्या अंत: प्रवृत्तीमुळे त्याच्यात सारासार विचार करण्याची क्षमता उदयास आलेली असते. तो आत्मोन्नातीच्या दृष्टीने प्रयत्नशील असतो. आपण नियतीच्या हातचे बाहुले नसून आपल्या जीवनाला योजनापूर्वक आकार देणे ही आपल्या हातची गोष्ट आहे याची त्याला जाणीव असते. यातून जी प्रेरणा उत्पन्न होते ती प्रेरणा म्हणजे आत्मविष्कार होय.

## *प्रस्तावना :-*

प्रत्येक व्यक्ती आपल्या योग्यतेनुसार ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील असतो. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या सामर्थ्याची जाणीव, आपल्या अस्तित्त्वाची जाणीव जोपर्यंत होत नाही तोपर्यंत व्यक्ती आपल्या आत्माविष्काराच्या गतीला चालना देवू शकत नाही. म्हणून शिक्षकामध्ये आत्मविष्काराचा स्तर कितपत आहे? उच्च आत्मविष्काराने व्यक्तीच्या जीवनात खरोखरच परिवर्तन घडते का? शिक्षक व शिक्षिका यांच्या

Review Of Research
Vol. 3 | Issue. 12 | Sept. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.org

आत्मविष्काराच्या स्तरात फरक आहे का? व जीवनात प्रत्येक गोष्टीत यश संपादन करण्यापूर्वी आत्मविष्कारासाठी काही उपाय सूचविता येतील का? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने संशोधकाने या संशोधनाची निवड केली.

आजच्या या विज्ञान युगामध्ये शिक्षणातून विशिष्ट अशी ध्येय साध्य करणे आवश्यक आहे. शिक्षणातून साध्य केले जाणारे हेतू कोणते? ध्येय कोणते? याचे उत्तर एकच असेल की, व्यक्तिला तीच्या ठिकाणी असणाऱ्या शक्तीची जाणीव होण्यासाठी सहाय्य करणे. अशा शक्ती विविध व्यक्तीच्या ठिकाणी असतात. हे सत्य यात गृहित धरलेले असते. दिव्यत्त्वाचा साक्षात्कार घडविते ते शिक्षण, मॅस्लो, एरीकसन आणि इतर नवमानसचिकित्सक यांचा विचार या आत्मविष्काराच्या, आत्मज्ञानाच्या कल्पनेला खूप जवळचा आहे. 'आत्मानांविध्दी' म्हणजेच स्वत:ला ओळखणे आणि 'अहंब्रम्हास्म' म्हणजे मी ब्रम्ह आहे. ही वेदवचने हेच सूचवितात.

शिक्षकांमध्ये आत्मविष्कार गुणांक कसा असतो? उच्च माध्यमिक शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षक यांच्या आत्मविष्कार गुणांकात काही फरक असावा का? असे विविध प्रश्न मनात आले. त्यामुळे सदर संशोधन हाती घेतले.

## संशोधनाची गरज व महत्त्व :

जीवनमूल्यांचा उचित संस्कार करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे शिक्षण. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विधायक विचार, श्रध्दा, आत्मविश्वास व स्वाभिमान रुजविता येतात. शिक्षणाने विद्यार्थ्यांची स्वप्रतिमा तयार करणे शक्य आहे. मनाचा कडवटपणा भावनिक पराभवाची खूण आहे आणि आत्मविष्कारातून स्वत:चे आदर्श, मापदंड यातून सुख देणारी मनोवृत्ती निर्माण करणे आज गरजेचे आहे.

यशासारखे यशदायी दुसरे काही नाही. या विधानात बरच तथ्य आहे. प्रत्येक व्यक्तीत आत्मविष्कार हा असतोच फक्त त्याची जाणीव करुन देणे गरजेचे असे संशोधकाला वाटते. प्रत्येक यशापयशामागे आत्मविष्कारची सकारात्मक व नकारात्मकता असते हे जाणून घेणे आवश्यक आहे. भावी आयुष्याचे शिल्पकार असलेल्या शिक्षकांच्या भावना, आत्मविकास, सर्जनशीलता, निखळ निरामय, विनोदीवृत्ती व सामाजिक कळकळ जाणून घेणे आवश्यक आहे. विकास ही संकल्पना मर्यादित न राहता तिची व्यापकता उच्च असावी. शिक्षकांमध्ये स्वत: विषयीची जाणीव निर्माण करुन स्वत:ला जीवनाच्या उत्तुंग शिखरापर्यंत पोहोचविण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे.

आजच्या शिक्षण पध्दतीमध्ये शिक्षक अध्यापनाचे कार्य करतांना विद्यार्थ्यांमध्ये निश्चित विचार, क्षमता आणि जबाबदारी स्विकारण्याची तयारी महत्त्वाकांक्षी वृत्ती, सर्जनशीलतेला वाव इत्यादी गोष्टी मागे पडतांना दिसून येत आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांचा वैचारिकतेला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. विद्यार्थ्यांमध्ये आस्थेवाईक मनोवृत्ती, नम्रता, सर्जनशीलता, आत्मविश्वास व सतत क्रियाशील वृत्ती निर्माण करणे सहज शक्य आहे. शिक्षकांच्या प्रेरणेने विद्यार्थ्यांने जीवनातील उच्चतम शिखर गाठणे आज याला अधिक महत्त्व आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

१. उच्च माध्यमिक शिक्षकांमधील आत्मविष्कार गुणांकाचा शोध घेणे.
२. महाविद्यालयीन शिक्षकांमधील आत्मविष्कार गुणांकाचा शोध घेणे.
३. उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांच्या आत्मविष्कार गुणांकाचा तौलनिक अभ्यास करणे.
४. उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकाचा तौलनिक अभ्यास करणे.
५. महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकाचा तौलनिक अभ्यास करणे.

## परिकल्पना :

### अ) शून्य परिकल्पना :

१. उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणताही फरक आढळत नाही.
२. उच्च माध्यमिक शिक्षक व उच्च माध्यमिक शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणताही फरक आढळत नाही.
३. महाविद्यालयीन शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणताही फरक आढळत नाही.
४. उच्च माध्यमिक शिक्षिका व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणताही फरक आढळत नाही.
५. उच्च माध्यमिक शिक्षक (संपूर्ण गट) व महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) यांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणताही फरक आढळत नाही.

### ब) संख्याशास्त्रीय परिकल्पना :

१. उच्च माध्यमिक शिक्षकांमध्ये महाविद्यालयीन शिक्षकापेक्षा आत्मविष्कार गुणांक जास्त आढळतो.
२. उच्च माध्यमिक शिक्षकांपेक्षा उच्च माध्यमिक शिक्षिका आत्मविष्कार गुणांकाच्या बाबतीत अग्रेसर असतात.
३. महाविद्यालयीन शिक्षकापेक्षा महाविद्यालयीन शिक्षिका आत्मविष्कार गुणांकाच्या बाबतीत अग्रेसर असतात.
४. उच्च माध्यमिक शिक्षिकांमध्ये महाविद्यालयीन शिक्षिकांपेक्षा आत्मविष्कार गुणांक जास्त आढळतो.
५. उच्च माध्यमिक शिक्षकांमध्ये (संपूर्ण गट) महाविद्यालयीन शिक्षकांपेक्षा (संपूर्ण गट) आत्मविष्कार गुणांक जास्त आढळतो.

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

### अ) व्याप्ती :

१. सदर संशोधन हे आत्मविष्कार गुणांकाशी संबंधित आहे. त्यामुळे ते व्यक्तीच्या जीवनाशी निगडित आहे.
२. संशोधकाने हाती घेतलेले संशोधन कार्य हे नवापूर तालुक्यातील उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन अशा २३४ शिक्षकांना लागू पडणारे आहे.
३. शिक्षकांच्या आत्मिक समाधान हा व्यक्तिमत्त्वातील पैलू असल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासाशी निगडित आहे.

### ब) मर्यादा :-

१. उच्च माध्यमिक स्तरावरील ५० आणि महाविद्यालयीन स्तरावरील ५० अशा १०० न्यादर्शावर केले आहे.
२. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष इतर उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षक स्विकारतीलच असे नाही.
३. सदर संशोधन हे नवापूर तालुक्यातील उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन अशा १०० शिक्षकांपूरतेच मर्यादित आहे.
४. ह्याच विषयावर वेगळ्या परिस्थितीत संशोधन केल्यास येणारे निष्कर्ष वेगळे येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**जनसंख्या :**

संशोधन विषयाशी संबंधित व्यक्तीचा किंवा घटकाच्या समुहाला जनसंख्या असे म्हणतात. न्यादर्श अभ्यासात ज्यांच्या विषयी निष्कर्ष काढायचे असतात. त्या सर्व व्यक्तींच्या किंवा वस्तुच्या समुहाला जनसंख्या म्हणतात.

सदर संशोधनात नवापूर तालुक्यातील उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन २३४ शिक्षक हे सदर अभ्यासाची जनसंख्या आहे.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधनासाठी यादृच्छिक नमुना (Random sampling) निवड पध्दतीचा उपयोग करुन नवापूर तालुक्यातील उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांमधून ५० उच्च माध्यमिक व ५० महाविद्यालयीन शिक्षक असे १०० शिक्षकांची न्यादर्श म्हणून निवड केली.

**संशोधनाची पध्दती व साधने :**

प्रस्तुत समस्येच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधन करतांना आत्मविष्काराचे मापन करण्यासाठी डॉ.के.एन.शर्मा यांनी प्रमाणित केलेल्या चाचणीचा वापर करण्यात आला.

नवापूर तालुक्यातील ५० उच्च माध्यमिक आणि ५० महाविद्यालयीन शिक्षकांना ही प्रश्नावली दिली. प्रश्नावली भरण्यासाठी शिक्षकांना एका तासाचा कालावधी देण्यात आला. सदर प्रश्नावली मध्ये एकूण ७५ विधाने असून त्यांना कधीच नाही -१ गुण, कधी कधी -२ गुण आणि अधिक -३ गुण याप्रमाणे गुणदान करुन माहिती संकलित केली.

सदर चाचणीची विश्वसनियता ०.८५ इतकी असून तिची सप्रमाणता ०.२९ इतकी आहे. म्हणजेच सदर चाचणी आत्मविष्कार गुणांक मापन करण्यासाठी वैध व विश्वसनीय आहे. या चाचणीवरुन उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांचा आत्मविष्कार गुणांक मापन करण्यात आला.

**माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ :**

संकलित माहितीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ काढण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि t-मूल्य या सांख्यिकीचा उपयोग करुन निष्कर्ष काढले.

**सारणी क्रमांक : १ उच्च माध्यमिक शिक्षिका व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t-मूल्य.**

| चले | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | 't' मूल्य | कोष्टक 't' मूल्य | सार्थकस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक शिक्षिका | १८ | १७९.७२ | ११.६० | ०.७० | २.०६ | ०.०५ स्तरावर असार्थक आहे. |
| महाविद्यालयीन शिक्षिका | ०९ | १७५.४४ | १६.२७ | | | |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षिका यांचे मध्यमान (M) = १७९.७२ व प्रमाण विचलन (SD) = ११.६० आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षिका यांचे मध्यमान (M) = १७५.४४ व प्रमाण

विचलन (SD) = १६.२७ आहे. त्यांचे t मूल्य ०.७० असून स्वाधिनता मात्रा २५ करीता कोष्टक t मूल्य २.०६ आहे. यात प्राप्त t मूल्य हे कोष्टक t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून ०.०५ या सार्थकता स्तरावर ते असार्थक आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार केला.

**निष्कर्ष :**

उच्च माध्यमिक शिक्षिका व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकात फरक नसून ते आत्मविष्कार गुणांकाच्या बाबतीत सारखेच आढळले.

**सारणी क्रमांक : २ उच्च माध्यमिक शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षक यांच्या आत्मविष्कार गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t-मूल्य.**

| चले | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | 't' मूल्य | कोष्टक 't' मूल्य | सार्थकस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक शिक्षक | ३२ | १७७.८१ | १६.०३ | १.४५ | २०.०० | ०.०५ स्तरावर असार्थक आहे. |
| महाविद्यालयीन शिक्षक | ४१ | १७२.५६ | १४.३५ | | | |

वरील सारणी क्रमांक २ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षक यांचे मध्यमान (M) = १७७.८१ व प्रमाण विचलन (SD) = १६.०३ आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षक यांचे मध्यमान (M) = १७२.५६ व प्रमाण विचलन (SD) = १४.३५ आहे. त्यांचे t मूल्य १.४५ असून स्वाधिनता मात्रा ७१ करीता कोष्टक t मूल्य २.०० आहे. यात प्राप्त t मूल्य हे कोष्टक t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून ०.०५ या सार्थकता स्तरावर असार्थक असल्यामुळे परिकल्पनेचा स्विकार आणि संख्याशास्त्रीय परिकल्पनेचा त्याग केला.

**निष्कर्ष :**

उच्च माध्यमिक शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षक यांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणही फरक आढळला नाही.

**सारणी क्रमांक : ३ उच्च माध्यमिक शिक्षिका व उच्च माध्यमिक शिक्षक यांच्या आत्मविष्कार गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t-मूल्य.**

| चले | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | 't' मूल्य | कोष्टक 't' मूल्य | सार्थकस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक शिक्षिका | १८ | १७९.७२ | ११.६० | ०.४८ | २.०१ | ०.०५ स्तरावर असार्थक आहे. |
| उच्च माध्यमिक शिक्षक | ३२ | १७७.८५ | १६.०३ | | | |

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षिका यांचे मध्यमान (M) = १७९.७२ व प्रमाण विचलन (SD) = ११.६० आहे. तसेच उच्च माध्यमिक शिक्षक यांचे मध्यमान (M) = १७७.८१ व प्रमाण विचलन (SD) = १६.०३ आहे. प्राप्त t मूल्य ०.४८ असून स्वाधिनता मात्रा ४८ करीता कोष्टक t मूल्य २.०१ आहे. यात प्राप्त t मूल्य हे कोष्टक t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून ०.०५ या सार्थकता स्तरावर असार्थकता आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार आणि संख्याशास्त्रीय परिकल्पनेचा त्याग केला.

**निष्कर्ष :**

उच्च माध्यमिक शिक्षिका व उच्च माध्यमिक शिक्षक हे आत्मविष्काराच्या बाबतीत सारखेच आढळले.

**सारणी क्रमांक : ४ महाविद्यालयीन शिक्षिका व महाविद्यालयीन शिक्षक यांच्या आत्मविष्कार गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t-मूल्य.**

| चले | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | 't' मूल्य | कोष्टक 't' मूल्य | सार्थकस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| महाविद्यालयीन शिक्षिका | ०९ | १७५.४४ | १६.२७ | ०.४८ | २.०१ | ०.०५ स्तरावर असार्थक आहे. |
| महाविद्यालयीन शिक्षक | ४१ | १७२.५६ | १४.३५ | | | |

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये महाविद्यालयीन शिक्षिका यांचे मध्यमान (M) = १७५.४४ व प्रमाण विचलन (SD) = १६.२७ आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षकांचे मध्यमान (M) = १७२.५६ व प्रमाण विचलन (SD) = १४.३५ आहे. त्यांचे t मूल्य ०.४८ असून स्वाधिनता मात्रा ४८ करीता कोष्टक t मूल्य २.०१ आहे. प्राप्त t मूल्य हे कोष्टक t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून ०.०५ या सार्थकता स्तरावर ते असार्थक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्विकार केला व संख्याशास्त्रीय परिकल्पनेचा त्याग केला.

**निष्कर्ष :**

महाविद्यालयीन शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्यात आत्मविष्काराच्या बाबतीत कोणताही फरक आढळला नाही.

**सारणी क्रमांक : ५ उच्च माध्यमिक शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) यांच्या आत्मविष्कार गुणांकाचे मध्यमान, प्रमाण विचलन आणि t-मूल्य.**

| चले | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | 't' मूल्य | कोष्टक 't' मूल्य | सार्थकस्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक शिक्षक (संपूर्ण गट) | ५० | १७८.५० | १४.४९ | १.८६ | १.९८ | ०.०५ स्तरावर असार्थक आहे. |
| महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) | ५० | १७३.०८ | १४.५८ | | | |

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) यांचे मध्यमान (M) = १७८.५० व प्रमाण विचलन (SD) = १४.४९ आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) यांचे मध्यमान (M) = १७३.०८ व प्रमाण विचलन (SD) = १४.५८ आहे. त्यांचे t मूल्य १.८६ असून स्वाधिनता मात्रा ९८ करीता कोष्टक t मूल्य १.९८ आहे. प्राप्त t मूल्य हे कोष्टक t मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून ०.०५ या सार्थकता स्तरावर असार्थक असल्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार व संख्याशास्त्रीय परिकल्पनेचा त्याग केला.

**निष्कर्ष :**

उच्च माध्यमिक शिक्षक (संपूर्ण गट) व महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) यांच्या आत्मविष्कार गुणांकात फरक नसून ते आत्मविष्कार गुणांकाच्या बाबतीत सारखेच आढळले.

## निष्कर्ष :

१. उच्च माध्यमिक शिक्षिका व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्या आत्मविष्कार गुणांकात फरक नसून ते आत्मविष्कार गुणांकाच्या बाबतीत सारखेच आहे.
२. उच्च माध्यमिक शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षक यांच्या आत्मविष्कार गुणांकात कोणताही फरक आढळला नाही.
३. उच्च माध्यमिक शिक्षिका व उच्च माध्यमिक शिक्षक आत्मविष्काराच्या बाबतीत सारखेच आढळले.
४. महाविद्यालयीन शिक्षक व महाविद्यालयीन शिक्षिका यांच्यात आत्मविष्कार बाबत कोणताही फरक आढळला नाही.
५. उच्च माध्यमिक शिक्षक (संपूर्ण गट) व महाविद्यालयीन शिक्षक (संपूर्ण गट) यांच्या आत्मविष्कार गुणांकात फरक नसून ते आत्मविष्कार गुणांकाच्या बाबतीत सारखेच आढळले.

## संदर्भ ग्रंथ :

१. बन्सी बिहारी पंडित, लता मोरे, शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स. २०१०.
२. भारतीय शिक्षण, (सप्टेंबर १९८३ जाने. १९९४), पुणे : भारतीय शिक्षण मंडळ
३. दांडेकर वा.ना. शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. पुणे श्री.विद्या प्रकाशन. २०००
४. दिवाण रश्मी Improving quality of Edu. Research. New Delhi : Atlantic Pub. & Dish. Vol. II. 2002
५. पंडित ब.बि. शिक्षणातील संशोधन. पुणे नित्य नूतन प्रकाशन
६. मोरे लता, शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान, नागपूर, पिंपळापूरे कं. प्रकाशन, २०१०
७. शिव खेरा, यश तुमतच्या हातात. मॅकमिलन इंडिया. २००२
8. Buch M.B. Forth Servey of Edu. Reserch,Vol. I. 1983-1988
9. Newman W.L. Social Research Methods : Qualitative & Quantitative Approaches. Bosten : M. A. Allyn & Bacon. 1997
10. e-book – Mind tools : Essential skills for an Excellent career.